MHKO070010432010

**रे.क.नं.१९८/२०१०** **आण्णासाहेब भरमू कुंभोजे वि. व्हनगोंडा आण्णा कुंभोजे**

<u>नि.क्र.१०८ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज हा वादीतर्फे प्रतिवादी नं.५अ चे वारस रेकॉर्डवर घेणेस परवानगी मिळणेविषयी दाखल केलेला आहे.

०२. वादी यांनी त्यांचे अर्जात असे कथन केले आहे की, प्रतिवादी नं.५अ हे दि.०२/०२/२०१६ रोजी मयत झालेले आहेत त्यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते. सदरचा अर्ज हा अंतिमतः गुणदोषावर निकाली होणे आवश्यक असलेने प्रतिवादी नं.५अ चे वारसांना याकामी सामील करुन घेणेत यावे. सबब, अर्ज मंजूर करणेविषयी विनंती वादी यांनी केलेली आहे.

०३. विरुध्द बाजूने सदर अर्जावरच त्यांचे म्हणणे देवून अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत व अर्ज नामंजूर करणेविषयी विनंती केलेली आहे.

०४. उभयपक्षाच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने सदरचा दावा हा प्रतिवादीविरुध्द हक्कज्ञापनासाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये सर्व आवश्यक पक्षकार हे अभिलेखावर असणे गरजेचे आहे. त्यांच्याशिवाय दाव्याचा अंतीम निकाल होणे हे अपेक्षित नाही. नि.क्र.७४ वाचला. तो अर्ज वादीने प्रतिवादी नं.५अ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी जो विलंब झालेला आहे तो माफ होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. नि.क्र.७४ वरील अर्ज हा खर्चासह मंजूर करणेत आलेला आहे. करिता खालील आदेश पारीत करण्यात येतो–

**– <u>आदेश</u> –**

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.१०८) हा नि.क्र.७४ वरील खर्चाची पुर्तता झाल्यास मंजूर समजणेत यावा.

२. नि.क्र.७४ वरील आदेश हा या अर्जावरील आदेशाचा भाग समजणेत यावा.

३. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2025.02.10 17:39:51 +0530

दि.१०/०२/२०२५ **(अ.त्रिं. मनगिरे)**

जयसिंगपूर. २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

**जयसिंगपूर.**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri.R.L.Mane. |
| Name of Court | 2nd Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 10/02/2025. |
| Judgment/order signed by the PO on | 10/02/2025. |
| Judgment/order uploaded on | 10/02/2025. |